# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 20 August 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक: २० ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.**

****

डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय शीघ्र कृती दल स्थापन करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या शीघ्र कृती दलात १४ सदस्यांचा समावेश असणार आहे. कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत: दखल घेत, आज त्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी घेण्यात आली. पीडित तरुणीचं नाव आणि छायाचित्र सार्वजनिक झाल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली. या प्रकरणी प्रथम माहिती अहवाल एफआयआर उशीरानं का दाखल करण्यात आला, असा प्रश्नही न्यायालयानं उपस्थित केला. याप्रकरणी राष्ट्रीय कृती दल-नॅशनल टास्क फोर्सला तीन आठवड्यांच्या आत तपासणीचा अंतिम अहवाल सादर करण्याची सूचना न्यायालयानं केली. याबाबतची पुढील सुनावणी येत्या २२ ऑगस्टला होणार आहे.

***

दरम्यान, सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षा व्यवस्थेत २५ टक्क्यांनी वाढ करण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. या घटनेनंतर राज्यातल्या निवासी डॉक्टरांच्या बेमुदत संपाचा आज आठवा दिवस आहे. सर्व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयं 'सुरक्षित झोन' घोषित करावीत आणि केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायदा लागू करावा, या मागणीवर निवासी डॉक्टर ठाम आहेत.

***

ठाणे जिल्ह्यात बदलापूर मधील आदर्श महाविद्यालयात दोन विद्यार्थिनीच्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर संतप्त पालकांनी आज सकाळी बदलापूर रेल्वे स्थानकात रेल रोको आंदोलन केलं. पालकांनी आदर्श महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळही आंदोलन केलं. रेल्वे स्थानकात चोख पोलीस बंदोबस्त तैनात असून पालकांची

समजूत काढण्याचा प्रयत्न केला जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान,  या प्रकरणी आरोपीला कडक शासन करण्यात येईल, असं सांगत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याचे निर्देश दिले. अशा प्रकरणात प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला. सखी शाळांमध्ये सावित्री समित्या स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

***

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती आज सद्भावना दिवस म्हणून पाळली जात आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी या राजीव गांधी यांच्या समाधीस्थळी जाऊन पुष्पांजली अर्पण केली.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. अधिकारी, कर्मचारी तसंच मुंबई पोलीस दलाचे अधिकारी आणि पोलिस कर्मचारी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांना यावेळी सद्भावना प्रतिज्ञा देण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. सद्भावना दिन कार्यक्रमात उपस्थित अधिकारी, कर्मचारी, नागरिकांनी, समाजात एकता, शांतता, बंधुता, सामाजिक सद्भावना कायम ठेवण्याची तसंच त्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतली.

***

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रतिष्ठेचे राष्ट्रीय भू विज्ञान पुरस्कार २०२३ प्रदान केले. केंद्रीय कोळसा आणि खाण काम मंत्री जी किशन रेड्डी आणि केंद्रीय राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे या कार्यक्रमाला उपस्थित होते. राष्ट्रीय भूविज्ञान जीवन गौरव, राष्ट्रीय युवा भूवैज्ञानिक आणि भूविज्ञानाच्या विविध क्षेत्रांसाठीचा राष्ट्रीय भूविज्ञान पुरस्कार अशा तीन श्रेणींमध्ये हे पुरस्कार देण्यात आले, तसंच भूविज्ञान क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

***

आर्थिक व्यवहारातील गैरप्रकार रोखून गुंतवणुकदारांचं हित जपण्यासाठी रिझर्व बँकेनं नव्या मार्गदर्शक सूचना काल तत्काळ प्रभावानं जाहीर केल्या. पारंपरिक बँकींग पद्धतीला फाटा देऊन पी टू पी माध्यमांमुळे कर्ज पुरवठादार आणि कर्जदार

थेट एकमेकांच्या संपर्कात येतात. यामध्ये वाढीव कर्ज पुरवठा किंवा हमी देताना निर्माण होणारी जोखीम गृहित धरुन अशा पुरवठादारांवर विमा उत्पादनांची विक्री करण्याबाबत आता निर्बंध घातले आहेत. व्यवहारांमध्ये मुद्दल, व्याज किंवा दोन्हींचे नुकसान झाल्यास ते कर्ज पुरवठादाराने भरुन द्यावं, असं नव्या निर्देशांमध्ये म्हटलं आहे.

***

नंदुरबार जिल्ह्यात शहादा तालुक्यात चिखली शिवारात बिबट्याने काल दोन मुलांवर हल्ला केला. आठ वर्षीय मुलगा वडिलांसोबत शेतात गेला असतांना दबा धरुन बसलेल्या बिबट्यानं त्याच्यावर हल्ला केला. तर त्याच्या सुमारे तासाभरानंतर एका नऊ वर्षीय मुलावर देखील बिबट्यानं हल्ला केला. या दोघांवर उपचार सुरु आहेत. दरम्यान, दोन महिन्यांपासून धुमाकूळ घालण्याऱ्या या बिबट्याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

***

राज्यात आज कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार तर मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

***